ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अपंगांच्या शिक्षणासाठी शासनाच्यासुविधा

**प्रा. डॉ.शर्मिला भाऊसाहेब पारधे**

*विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र)संचर्लि, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

सर्वसामान्य व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षणाचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व अपंग व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये आहे. अपंग विद्यार्थ्यांना आलेल्या मर्यादेमुळे सर्वसामान्य मुलांसारखे शिक्षण घेण्यात अडचणी येतात. म्हणून शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना अपंग विद्यार्थी म्हणून त्यांच्याकडे शिक्षकांनी दुर्लक्ष न करता विशेष शैक्षणिक गरजा असणारे विद्यार्थी हा दृषिकोन ठेऊन अध्यापनाचे काम केल्यास सर्वसामान्य मुलाप्रमाणे अपंग मुलेही शिक्षणात प्रावीण्य मिळवू शकतात व स्वावलंबी जीवन जगू शकतात. याची प्रचिती आपणास विविध क्षेत्रांमध्ये अपंग व्यक्ती कार्य करीत आहेत यावरुन दिसून येते. अपंग विद्यार्थ्यांच्या विशेष गरजा ह्या खालील प्रमाणे आहेत.

**१ अंध –** अंध विद्यार्थ्यांना दृष्टी नसल्यामुळे शिक्षण घेत असतांना वाचन व लेखन कौशल्याला मर्यादा येतात. याकरिता ब्रेल लिपीतील साहित्य उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यामध्ये लेखन व वाचन कौशल्य येते. त्याचप्रमाणे वाचकाद्वारे व दृकश्राव्य माध्यमाद्वारे हस्तलिखित पुस्तकांचे ज्ञान त्यांना उपलब्ध करुन दिल्यास व गणित, शास्त्र यासारख्या विषयांना पर्यायी विषय दिल्यास ते आपले शिक्षण सामान्य मुलांप्रमाणे पूर्ण करु शकतात.

**२. कर्णबधिर –**कर्णबधिरांना शिक्षण घेत असतांना मुख्य अडचण येते ती भाषा व संवादाची. कर्णबधिर व्यक्तिंनी शब्दच ऐकलेले नसल्यामुळे त्यांना शब्द उच्चारणे व लिहिणे याचे ज्ञान अवगत होत नाही. याकरिता श्रवणशक्ती वाढविणारी, श्रवणयंत्रासारखी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे व औष्ठ्यवाचन, खाणाखुणांची भाषा अवगत करुन ते देखील सामान्य मुलांप्रमाणेच शिक्षण पूर्ण करु शकतात.

**३. अस्थिव्यंग –** अस्थिव्यंग विद्यार्थी हे सामान्य मुलांप्रमाणेच शिक्षण घेऊ शकतात. परंतु, त्यांच्या हालचालींवर मर्यादा असल्यामुळे त्यांना शाळेत येणे व वर्गात इतर सामान्य मुलांबरोबर बसणे यामध्ये अडचणी येतात. त्याकरिता शाळांमध्ये ह्या अपंग विद्यार्थ्यांना वावरता यावे यादृष्टीने रॅम्प्स् रेलिंग, इ. सुविधा उपलब्ध करुन इमारत अडथळामुक्त केल्यास तसेच अपंगांना सोयीस्कर असे फर्निचर आणि कॅलिपर्स, क्रचेस, तीन चाकी सायकल, इ. सहाय्यभूत उपकरणे उपलब्ध करुन दिल्यास अस्थिव्यंग विद्यार्थी देखील सामान्य मुलांप्रमाणेच आपले शिक्षण पूर्ण करु शकतो.

**४. मतिमंद –** मतिमंद विद्यार्थ्यांचा मानसिक विकास न झाल्याने त्यांचा बुद्ध्यांक हा सामान्य मुलांपेक्षा कमी असतो. तेंव्हा त्यांच्या बुद्ध्यंकाप्रमाणे व क्षमतेप्रमाणे त्यांचा वैयक्तिक , शैक्षणिक, कार्यक्रम तयार करुन राबविल्यास त्यांच्यामध्ये वेगवेगळी कौशल्ये निर्माण करता येतात व त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आणता येतो. ७० ते ८० बुद्ध्यांक असलेल्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष दिल्यास ते सामान्य शाळांमध्ये देखील आपले शिक्षण पूर्ण करु शकतात.

केंद्र शासनाने अपंग व्यक्तिंच्या सर्वांगीण विकासासाठी अपंग व्यक्ति (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हा कायदा केला असून या कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात सुरु आहे. या कायद्यात कलम २६ मध्ये अपंगाचे शैक्षणिक हक्क विशद केलेले आहेत ते खालील प्रमाणे

१) प्रत्येक १८ वर्षांपर्यंतच्या अपंग मुलाला योग्य अशा वातावरणात मोफत शिक्षण उपलब्ध करुन देणे हे संबंधित राज्य शासनाची व स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. असे शिक्षण घेत असतांना सामान्य विद्यार्थ्यांबरोबर अपंग विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे यादृष्टीने एकात्मिक शिक्षणास प्रोत्साहन मिळते.

२) जे विद्यार्थी अतितिव्र अपंगत्वामुळे सामान्य शाळेमध्ये सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा मुलांची व्यवस्था अपंग विद्यार्थ्यांच्या विशेष शाळांमध्ये करण्यात यावी.

३) अशा विशेष शाळा सर्व शैक्षणिक साधनांची उपलब्धता व त्याठिकाणी व्यावसायीक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्धवेळ क्लासेस, अनौपचारीक शिक्षण, मुक्तशाळा व विदयापीठे यामधून शिक्षण , शिक्षणामध्ये दृक–श्राव्य साधनांचा वापर, मोफत पुस्तके व शालेय साहित्य, उपलब्ध करुन देणे इत्यादी.

५) अपंग विद्यार्थ्यांना शाळेत येण्याकरता वाहनांच्या सुविधा उपलब्ध करुन देणे किंवा पर्यायी अर्थसाहाय्य करणे.

६) शाळा कॉलेजच्या इमारती अपंग विद्यार्थ्यांसाठी अडथळामुक्त करणे, अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, अपंग विद्यार्थ्यांविषयी पालकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये तक्रारनिवारण मंच स्थापन करणे.

७) परिक्षा पद्धतीत सुधारणा करुन अंध विद्यार्थ्यांना गणितासारख्या विषयात सुट देणे.

८) अपंग विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात शैक्षणिकदृष्ट्या योग्य ते फेरबदल करणे.

९) कर्णबधिर विद्यार्थ्यांकरिता अभ्यासक्रमांमध्ये एकाच भाषेचा वापर करणे, अंध विद्यार्थ्यांना वाचक व लेखनिकाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

त्याचप्रमाणे अपंग व्यक्ति आधिनियम १९९५ च्या कलम ३९ प्रमाणे कोणत्याही शैक्षणिक संस्थेत अपंग विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारता येत नाही. प्रत्येक शासकिय व अनुदानित

शैक्षणिक संस्था या अपंगांसाठी ३ % जागा प्रवेशासाठी आरक्षित ठेवतील अशी कायदेशीर तरतुद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यातील अपंग व्यक्तींची संख्या : – सन २००१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्र राज्यात

**अपंगांची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.**

| क्र. | अपंगत्वाचा प्रकार | अपंग व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | अंध | ३२०४६६ | २६०४६४ | ५८०९३० |
| २. | मुके | ६३८०२ | ४९२४१ | ११३०४२ |
| ३. | बहिरे | ५१८८९ | ४०६०१ | ९२३९० |
| ४, | अस्थिव्क्षंग | ३७४६७१ | १९५२७४ | ५६९९४५ |
| ५. | मतिमंद | १२३१४९ | ९०१३५ | २१३२७४ |
| | एकूण | ९३३८६७ | ६३५७१५ | १५६९५८२ |

## अपंग विदयार्थ्यांच्या शैक्षणिक सोई – सुविधा

महाराष्ट्र राज्यातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिव्यंग व मनोविकलांग मुलांना शिक्षण प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करु देणे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याकरिता अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत अपंगांचे शिक्षण व पुनर्वसन विषयक योजना राबविल्या जात आहेत. तसेच शालेय शिक्षण विभागामार्फत देखील एकात्मिक शिक्षण व सर्वसमावेशक शिक्षण मोहीम राबविली जात आहे.

## १. अपंगांना शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या राजयातील शासकीय संस्था

६ ते १८ वयोगटातील अपंग विदयार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाने शासकीय संस्था सुरु केलेल्या असून या शासकीय संस्थांमध्ये अपंग विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची विनामूल्य व्यवस्था आहे.१८ वर्षावरील विद्यार्थ्यांना शासकीय प्रौढ अपंगांच्या प्रशिक्षण केंद्रामधून

त्यांना व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. राज्यात अशा २१ शासकीय संस्था कार्यरत असून त्याखालील ठिकाणी आहेत.

शासकीय मूकबधिर विद्यालय (अकोला, अलिबाग, औरंगाबाद)

शासकीय अंध शाळा (कुडाळ – सिंधुदुर्ग, लातूर, नाशिक भंडारा)

शासकीय अपंग बालगृह (नागपूर, औरंगाबाद, मिरज–सांगली)

शासकीय बहुउद्देशीय अपंग समिश्र केंद्र (पुणे, जळगांव, वाशिम, वर्धा, नागपूर,अंबेजोगाई–बीड)

शासकीय प्रौढ अपंगांची कार्यशाळा (नागपूर, औरंगाबाद, उल्हासनगर–ठाणे, मिरज–सांगली)

अपंगांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, वर्धा.

**२. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्क्षात येणाऱ्या संसाथांमधून अपंगांचे शिक्षण व प्रशिक्षण**

वय वर्षे ६ ते १८ वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या (अंध, मूकबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद) विशेष शाळेमध्ये शिक्षण, भोजन व निवासाची विनामूल्य सुविधा पुरविल्या जातात. यामध्ये काही अनिवासी शाळांचा देखील समावेश आहे. त्याचप्रमाणे १८ वर्षांवरील अपंग विद्यार्थ्यांना अपंगत्वानुरुप कार्यशाळांमधून व्यावसायीक प्रशिक्षण देण्यात येते. अशा शाळांना प्रथम आयुक्त, अपंग कल्याण यांचे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक असते. अशा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त संस्थांना निधीच्या उपलब्धतेनुसार शासनामार्फत वेतन, वेतनेतर इमारत भाडे व परिपोषण या बाबींवर अुनदान दिले जाते.

**३. शालेय शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती**

इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद कुष्ठरोगमुक्त व मानसिक आजाराने अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना शालेक शिक्षणासाठी खालील दराने शिष्यवृत्ती दिली जाते.

| **क्र.** | **इयत्ता** | **शिष्यवृत्तीचा दर** |
|---|---|---|
| १. | इयत्ता १ ली ते ४ थी (कर्णबधिरांसाठी ५ वी वर्गापासून) | दरमहा रुपये ५० /- |
| २. | इयत्ता ५ वी ते ७ वी | दरमहा रुपये ७५ /- |
| ३. | इयत्ता ८ वी ते १० वी | दरमहा रुपये १००/- |
| ४. | मतिमंद व मानसिक विकलांग विद्यार्थी (नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळांतील) | दरमहा रुपये ७५ /- |

**पात्रता**

१) अपंग विद्यार्थी इयत्ता पहिली ((कर्णबधिरांसाठी ५ वी वर्गापासून) ते दहावी पर्यंत कोणत्याही इयत्तेत शिकवणारा असावा. तसेच एखा वर्गात एक पेक्षा जास्त वेळा नापास झालेला नसावा.

२) विद्यार्थ्यांकडे अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ प्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी नेमलेल्या वैद्यकीय मंडळाचे (जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या अध्यक्षतेखाली) ४० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र असावे.

३) या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाच्या अटीची मर्यादा नाही.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. विहीत नमुन्यातील शिष्यवृत्तीचा अर्ज शाळा प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्जासोबत गुणपत्रक व अपंगत्वाचा दाखला जोडावा.

**संपर्क**

शाळा प्रमुखाने संबंधित जिल्ह्याच्या समाज कल्याण अधिकारी , गट ‘अ’, जिल्हा परिषद आणि मुंबई/मुंबई उपनगर या जिल्ह्यांत विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयातून विहित अर्ज उपलब्ध करुन ते विद्यार्थ्यांना द्यावेत व परिपूर्ण भरलेले व आवश्यक त्या दाखल्यासह याच कार्यालयात सादर करावेत.

इ. १० वी नंतर शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

इयत्ता १० वी नंतर उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, व्यावसायिक, तांत्रिक, वैद्यकिय व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद, कुष्ठरोगमुक्त या मानसिक आजाराने अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी खालील दराने शिष्यवृत्ती दिली जाते.

## १) निर्वाह भत्ता

| क्र. | अभ्यासक्रम | शिष्यवृत्तीचा दर | |
|---|---|---|---|
| | | वसतिगृहात राहणारे | वसतिगृहात न राहणारे |
| १. | गट – अ (वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण ॲग्रीकल्चर, व्हेटरनरी मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण | दरमहा रु. ४२५ /– | दरमहा रु. १९०/– |
| २. | गट – ब (अभियांत्रिकी, तांत्रिक स्थापत्य, वैद्यकशास्त्र, पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रु. २९०/– | दरमहा रु. १९०/– |
| ३. | गट – क (कला, विज्ञान, वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम) | दरमहा रु. २९०/– | दरमहा रु. १९०/– |
| ४. | गट –ड (द्वितीय वर्षे व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम) | दरमहा रु. २३०/– | दरमहा रु. १२०/– |
| ५. | गट–इ (११ वी, १२ वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम) | दरमहा रु. १५०/– | दरमहा रु. ९०/– |

**२) वाचक भत्ता** – अंध विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याबरोबरच खालील दराने वाचक भत्ता देण्यात येईल.

| अभ्यासक्रमाचा गट | वाहक भत्ता दरमहा रु. |
|---|---|
| गट अ, गट ब, गट क | १००/– |
| गट ड | ७५/– |
| गट ई | ५०/– |

## ३)शैक्षणिक शुल्क

अर्जदाराला विद्यापीठ/संस्था/बोर्डाला भरावे लागणारे सक्तीचे शुक्ल प्रवेश फी, ट्युशन फी, नोंदणी फी, गेम्स, युनियन, लायब्ररी, मॅगेझिन व वैद्यकीय तपासणी यासारखे द्यावे

लागणारे शुल्काकरिता रक्कम दिली जाईल. विद्यार्थ्यांना भराव्या लागणाऱ्या परतावा, डिपॉझिट, क्वेशन मनी व सिक्युरिटी डिपॉझिट इत्यादीसारख्या रक्कमा दिल्या जाणार नाहीत.

**४) अभ्यासदौरा खर्च**

व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाकरिता ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासदौरा सक्तीचा आहे अशा अभ्यासदौऱ्याच्या प्रत्यक्ष प्रवास खर्चाची रक्कम अथवा रुपये ५००/– वार्षिक पर्यंत मर्यादित रक्कम मंजूर करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मात्र हा अभ्यासदौरा अनिवार्य असल्याचे संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५) प्रकल्प (थेसीस) टंकलेखन व मुद्रण खर्च**

शिक्षण प्रमुखाच्या शिफारशीप्रमाणे संशोधनात्मक कार्य कारणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रकल्प (थेसीस) टंकलेखन व मुद्रणासाठी येणाऱ्या खर्चाकरिता वार्षिक रक्कम रुपये ६००/– पर्यंत मंजूर करण्यात येईल.

पात्रता १) अपंग विद्यार्थी कोणत्याही वरील अभ्यासक्रमाचा शिक्षण घेणारा असावा. तसेच तो प्रत्येक वर्षी उत्तीर्ण असावा. २) विद्यार्थ्यांकडे अपंग व्यक्ति अधिनियम १९९५ प्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी नेमलेल्या वैद्यकीय मंडळाचे (जिल्हा शल्यचित्सिक यांच्या अध्यक्षतेखालील) ४० टक्केपेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र असावे. ३) या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाच्या अटीची मर्यादा नाही.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) विहित नमुन्यातील शिष्यवृत्तीचा अर्ज शाळा प्रमुखाकडे सादर करणे आवश्यक आहे.

२) अर्जासोबत गुणपत्रक व अपंगत्वाचा दाखला जोडावा.

**संपर्क** : शाळा /महाविद्यालयातील प्रमुखाने संबंधित जिल्ह्याच्या समज कल्याण अथिकारी, गट 'अ' जिल्हापरिषद आणि मुंबई/ मुंबई उपनगर या जिल्ह्यांत विशेष जिल्हा समाज

कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयातून विहित अर्ज उपलब्ध करुन दे विदयार्थ्यांना द्यावेत व परिपूर्ण भरलेले व आवश्यक त्या दाकल्यासह याच कार्यालयात सादर करावेत.

**६) अपंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे –**शारीरिक पुनर्वसनाच्या दृष्टीने अपंग विद्यार्थी तसे च अपंग व्यक्ति यांना लागणारे साहाय्यभूत साधने उदा. अस्थिव्यंग अपंगांसाठी कॅलिपर्स, क्रचेस, तीन चाकी सायकल, कृत्रिम अवयव इत्यादी कर्णबधिरांसाठी वैयक्तिक श्रवणयंत्र व अंधांसाठी चष्मे, वॉकिंग स्टीक व दहावीनंतर शिक्षण घेणाऱ्या अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्ड्स इत्यादी साधने रुपये ३०००/– पर्यंत ची पुरविण्यात येतात. त्यासाठी उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| रुपये. १५००/– दरमहा पर्यंत | १०० टक्के सहाय्य |
| रुपये १५०१ /– ते २००० पर्यंत | ५० टक्के सहाय्य |

त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या योजनेतून रुपये ६०००/– पर्यंत किमतीची साधने पुरविण्यात येतात. तसेच ग्रामीण अपंग पुनर्वसन या केंद्र शासनाच्या योजनेखाली सिंधुदुर्ग, कोल्हापूर,बुलढाणा,औरंगाबाद, लातूर, वर्धा, येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंदे स्थापन केली असून या केंद्रामार्फत वरील साधने उपलब्ध करुन दिली जातात.

**७) गुणवत्ताधारक अपंग विद्यार्थ्यांचा गौरव**

प्रत्येक विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामध्ये इयत्ता १० वी, १२ वी गुणानुक्रमे उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येकी ३ अंध, ३ मुकबधिर व ३ अस्थिव्यंग/ स्पास्टीक विद्यार्थ्यांना रुपये १०००/– रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

**८) इतर सोई सुविधा**

✲ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल, २००१ अन्वये अपंग मुलांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये प्रवेशासाठी ३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

❋ समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहात अपंगांसी ३ टक्के राखीव जागा ठेवण्यात आलेल्या आहेत.

❋ समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अनुसूचित जाती, जमाती विमुक्त व भटक्या जमाती, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विदयार्थी यामध्ये अपंग विद्यार्थी असल्यास त्यांना प्रवेशासाठी प्राधान्य व एकूण जागांच्या ५ टक्केपर्यंत प्रवेश देण्यात येतो.

❋ शालेय शिक्षण विभागामार्फत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या वसतिगृहामध्ये ३ टक्के अपंग विद्यार्थ्यांना आरक्षण ठेवण्यात आले आहे.

❋ उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखाली वसतिगृहामध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ३ टक्के जागा अपंग विद्यार्थ्यांकरीता राखीव आहेत.

❋शिक्षणशास्त्र, अध्यापक, पदविका, अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अपंग विद्यार्थ्यांना तीन टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

❋ व्यावसायिक व औद्योगिक तंत्र प्रशिक्षण संस्थांमध्क्षे अपंगांना प्रवेशासाठी ३ टक्के जागा राखीव आहेत.

❋ अपंग व्यक्तिंना (विदयार्थ्यांना) एस.टी. प्रवास भाड्यात ७५ टक्के सवलत व त्याच्या सोबत्यास ५० टक्के सवलत देण्यात आलेली आहे. ही सवलत अपंग ओळखपत्राच्या आधारे घेता येते.

वरील सोई सुविधांचा लाभ अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ प्रमाणे खालील प्रकारचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्त्वाचे प्रमाणपत्र असलेल्या विदयार्थ्यांना घेता येईल.

१) पूर्णतः अंध २) अंधदृष्टी ३) कुष्ठरोगमुक्त

४) अस्थिव्यंग/ सेरेब्रल पाल्सी ५) कर्णबधिर ६) मतिमंद

७) मानसिक आजार

अपंगांना प्रमाणपत्र देण्याकरिता वैद्यकीय मंडळ

१) वैद्यकीय महाविद्यालये संलग्न रुग्णालये १) वैद्यकीय अधिक्षक, २) निवासी वैद्यकीय अधिकारी, ३) संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ (नेत्रतज्ज्ञ/ अस्थिशल्य चिकित्सक/कान, नाक, घसा तज्ज्ञ/ मानसोपचार तज्ज्ञ)

अपंग व्यक्तींसाठी अभिमत न्यायालय – शासनाने अपंगांसाठी देऊ केलेल्या सोई सुविधा पासून अपंग व्यक्तिंना वंचित ठेवण्यात येत असेल अथवा अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ प्रमों अपंगांना प्राप्त झालेल्या हक्कांपासून वंचित ठेवण्यात येत असेल तर अशा अपंग व्यक्तींना या कायद्याप्रमाणे स्थापन केलेल्या आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे १ यांच्या अभिमत न्यायालयात दाद मागता येते.

**संपर्क कार्यालय**

१. मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय

२. उर्वरित जिल्ह्यांकरिता समाज कल्याण अधिकारी , गट अ, जिल्हा परिषद यांचे कार्यालय.

अधिक माहिती व संपर्कासाठी

आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे १ यांचे कार्यालय.

दूरध्वनी क्रमांक – ०२०–२६१२६४७१ / २६१२२०६१फॅक्स क्रमांक – ०२० – २६१११५९०

**संदर्भसूची –**

*समावेशक शिक्षण – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांची प्राथमिक शिक्षकांसाठी हस्तपुस्तीका*

*डॉ.शेवतेकर – व डॉ. निकुमे – विशेष मुलांचे विशेष शिक्षण.*